# प्रकरण दुसरे

## दि.बा.मोकाशी

### अ) दि.बा.मोकाशी यांचे साहित्य ---

दिगंबर बाळकृष्ण मोकाशी यांचा जन्म २७ नोव्हेंबर १९१५ रोजी कल्याण जवळील ऊरण या गावी झाला. त्यांचे बालपण बरेचसे कल्याण शहरात गेले. त्यांचे वडील बाळकृष्ण गणेश मोकाशी हे पोस्ट मास्तर म्हणून काम पाहात होते. त्यांना वाचनाचा विशेष नाद होता, परंतु पुस्तक विकत घेता येतील एवढी ऐपत नव्हती. तेव्हा पोस्टात येणारी व्ही.पी. युक्तीने सोडवून घेऊन ते ती पुस्तके, नियतकालिके वाचत व वाचल्यानंतर परत पोस्टाने मालकाकडे नीट पाठवून देत. बेताच्याच आर्थिक परिस्थितीतही त्यांचा संसार सुखात चाललेला होता. त्यामुळे दि. बा.चे बालपण अगदी आनंदात गेले. त्यांना सख्खी पाच मावडे व अनेक चुलत मावडे होती. त्या सर्वांच्या सहवासात त्यांचे बालपणीचे दिवस कसे अगदी फुलपाखरासारखे निघून जात होते.

लहानपणापासून वडिलाप्रमाणेच घरात आलेले सर्व साहित्य अतिशय गोडीने वाचणाऱ्या दि.बा.चे शालेय शिक्षणात फारस लक्ष नसल्यामुळे ते मॅट्रिकची परीक्षा अनुत्तीर्ण झाले. नंतर धुळ्यातील एका खाजगी संस्थेत रेडिओ दुरुस्तीचे शिक्षण घेत असतानाच उत्तमोत्तम इंग्रजी साहित्य त्यानी आवडीने वाचले. तंत्रज्ञानाचे शिक्षण घेतल्यानंतर पुण्याच्या सदाशिव पेठेतील पेरन गेटा जवळ त्यानी रेडिओ दुरुस्तीचे लहानसे दुकान सुरु केले. तत्पूर्वी अधून मधून लघुकथा लिहिणाऱ्या मोकाशींच्या लिखाणाला पुण्यात आल्यावर मात्र अधिक जोम व नियमितपणा आला. खऱ्या अर्थाने त्यांचे लेखन तेव्हाच बहराला आले. तेथे त्यांना बरेच साहित्यिक व संपादक स्नेही म्हणून लाभले. रेडिओ मेकॅनिक म्हणून ओळखण्या पेक्षा मोकाशी एक लेखक म्हणूनच पुण्यात अधिक परिचित झाले. त्याचा त्यांना

अभिमानही होता. कथे बरोबर त्यांनी अन्य वाङ्.मयप्रकारही यशस्वीरित्या हाताळले, त्याच वेळी कु.मालिनी देवळ या नात्यातल्याच मुलीशी ते विवाहबध्द झाले व साहित्या बरोबरच त्यांचा संसारही सुरु झाला. पत्नीच्या व पद्मा व बिंबा या दोन कन्यांच्या सहवासात,बेताच्याच मिळकतीत पण सुखासमाधानात त्याचा संसार सुरु झाला पण हे सुख विधात्याला पाहावले नाही. म्हणूनच की काय उतार वयात त्याना कॅन्सर सारख्या भयंकर रोगाने ग्रासले व जून १९८१ मध्ये त्यांना हा इहलोक सोडून जावे लागले.

दि.बा.मोकाशींचे व्यक्तिमत्व प्रसन्न होते. किंचित कुरळे व जरा उलटे वळलेले केस, स्नेहाळ डोळे, जाड भुवया व जाड-सर जिवणी, गोलसर चेहरा, ठेंगणीशी पण दणकट वाटणारी देहयष्टी , स्वच्छ धुवट पायजमा व तसाच लांब बाह्यांचा झब्बा हा त्यांचा नेहमीचा पेहराव. त्यांचे वागणे विसराळू होते पण ते कधी रागावलेले,त्रासलेले अगर अडचणीत,काळजीत असलेले दिसत नसत.लेडीज सायकल हे त्याचे ठरलेले वाहन.आपल्या सरळ,सात्विक स्वभावामुळे पहिल्या भेटीतच ते अनोळखी व्यक्तीस आपलेसे करुन घेत. ते अजातशत्रू असल्यामुळे विविध क्षेत्रातील लोक त्यांचे स्नेही बनले व ही त्याची प्रतिमा अखेरपर्यन्त अशीच उजळ राहिली.

`अनंता` ही त्यांची पहिली कथा सन १९३८-३९ च्या सुमारास `धनुर्धारी` साप्ताहिकात प्रसिध्द झाली.पण त्यांच्या कथालेखनात नियमितपणा आला तो १९४१ पासून. सुरुवातीला त्यांनी लघुकथाच लिहिल्या, किंबहुना कथालेखनातच मोकाशी रमल्याचे दिसते. १९४७ पर्यन्त लिहिलेल्या कथा पैकी निवडक पंधरा कथांचा संग्रह `लामणदिवा` या नावाने सप्टेंबर १९४७ मध्ये प्रसिध्द झाला व त्यांच्या या पहिल्या कथा गुच्छाने त्याचे नाव वाचक व समीक्षक यांच्या मनात कोरले गेले पण १९६० साली नवकथेच्या वैभवकाळात निघालेल्या `आमोद सुनासि आले` या कथासंग्रहानेच कथाकार म्हणून दि.बा.मोकाशी यांना विशेष मान्यता मिळवून दिली.

१९३९ ते १९८१ पर्यन्तच्या जवळजवळ चाळीस बेचाळीस वर्षाच्या काळात मोकाशींनी एकशे चाळीसच्या वर कथा लिहिल्या. त्यांच्या कथांचे एकूण अकरा संग्रह

प्रसिध्द झाले आहेत. तर कांही कथा अद्याप पुस्तक रुपात प्रसिध्द व्हावयाच्या आहेत. त्यांचे प्रसिध्द झालेले अकरा कथा संग्रह म्हणजे (१) लामणदिवा - १९४७, (२) कथा मोहिनी - १९५३ (३) आमोद सुनासि आले - १९६० (४) असा असावा नवरा - १९६२ , (५) वणवा - १९६५ (६) चापलूस - १९७४ (७) पाच हजार गायी - १९७५ (८) आदिकथा - १९७६ (९) माऊली - १९७७ (१०) तू आणि मी - १९७८ (११) आम्ही मराठी माणसं - १९८१ हे होत.

कथा लेखनाखेरीज मोकाशींनी अन्य साहित्य प्रकारही यशस्वीपणे हाताळले आहेत. ` देव चालले - १९६२,` पुरुषाला शंभर गुन्हे माफ - १९७१`, ` आनंद ओवरी - १९७४`, ` कामसूत्रकार वात्स्यायन - १९७६` या कादंबऱ्या तर ` स्थळ यात्रा - १९५८`, ` पालखी - १९६४`, ` अठरा लक्ष पावलं - १९७१ `, ` संध्याकाळचे पुणे - १९८१` ही त्यांची ललित पुस्तके प्रवास वर्णनात्मक म्हणून गणाली जात असली तरी रुढ प्रवास वर्णनापेक्षा अगदी वेगळ्या दृष्टिकोणातून व तंत्रातून हे लेखन केलेले आहे. या सर्व पुस्तकावरुन कथाकार मोकाशी यांचे अन्य लेखन किती सरस आहे याची साक्ष पटते. त्याचप्रमाणे ` आव्हाण - १९६०`, ` धणधणतो घंटानाद - १९६५`, ` फ्रॅाम रशिया वुईथ लव्ह - १९६७`, मॅनवुईथ द गोल्डन गन - १९६७`, ` डॉ.नो - १९६८`, ` थंडर बॉल - १९६८`, ` लिव्ह अँन्ड लेट डाय - १९६९`, ` मृत्यू संकेत - १९७१`, ` प्लासिचा रणसंग्राम - १९७४` ही भाषांतर केलेली पुस्तके आहेत.

शास्त्रीय विषयावर लेखन करण्याचा मोकाशींना प्रथम पासून छंद होता. रेडिओ दुरुस्तीवरचे त्यांचे पुस्तक लोकप्रिय झाले होते. ` यंत्र व तंत्र`, ` जमीन आपली आई` अशी विज्ञानविषयक पुस्तकेही त्यांनी लिहिली. मराठी विज्ञान कथेत त्यांनी अल्पशी पण मोलाची भर घातली आहे.

दि.बा.मोकाशींना अन्य लेखकाप्रमाणे लहानपणाच वाचनाचे वेड जडले. ` नाथ माधवांच्या कादंबऱ्या`, प्रिन्स लिस्मार्कचे चरित्र` अशी मिळेल ती पुस्तके ते आधाशासारखे वाचीत. अशा वाचनातूनच स्वत: लेखन करण्याची उर्मी त्यांना आली. मात्र मोकाशींच्या मते लेखनाचे बीज त्यांच्या मनात रुजले ते बालपणाच.

त्यांच्या वडिलांनी मोरोपंतांच्या आर्या पाठ करून घेतल्या त्यामुळे.

रेडिओ दुरुस्तीचे तांत्रिक शिक्षण घेतल्यानंतर मोकाशींनी नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी स्वातंत्र्य लढ्यातही ते सहभागी झाले. या अस्थिरतेच्या काळात त्यांना बरीच वणवण करावी लागली. बेकारीचे चटके सोसावे लागले. अशा भ्रमंतीत त्यांना आधार लाभला तो लेखनाचा. आयुष्यातील वैराण दिवसात त्यांनी आश्रय घेतला तो कथेचा । `अनंता` या त्यांच्या पहिल्या कथेत असाच एक तरुण तात्पुरत्या नोकऱ्या करीत अखेर एका श्रीमंत विधवेचा प्रियकर म्हणून जगू लागतो. लेखकाच्या मनात भरलेली बेकारीची भीती, त्यामुळे येणारी चीड, असहायता नायकाला असंमत मार्गाने विधवेच्या स्वाधीन करून कथेवाटे मोकळी केली गेली.

मोकाशींनी स्वतःच्या समस्या व भोवतालच्या निरीक्षणातून कथा लिहिल्या. त्या जोडीवर आणखी एक परिणामकारक पाया त्यांच्या कथा लेखनास लाभला. किंबहुना लहानपणापासून पडलेल्या `कोऽहम् ?` या कोड्याने त्यांच्यातील कलाकार आकारास येत होता, `मी कोण ? मी इथे का ?` हे त्यांना अगदी लहान वयात पडलेले मूलभूत प्रश्न. आपल्या अस्तित्वाबद्दल त्यांना आश्चर्य वाटत असे. पुढे आयुष्याच्या कोलाहलात सापडल्यावर त्यांच्या मनात येत राही की, `पुढे काय ? अमकं झालं, तमकं मिळालं, पुढे काय ?` जगण्याचा हेतू काय आणि आयुष्याचा हा खेळ कशासाठी ? अशा तत्वज्ञानी विचारातून मोकाशींच्या लेखनाला सखोलता व व्यापकता लाभली. त्यांची कथा प्रगल्भ, जीवनदर्शी होत गेली. मोकाशींच्या तरल, अस्वस्थ मनाच्या स्थितीचे चित्रण आपल्या `फुलेचि झाली भ्रमर` या कथेतून अरविंद गोखले यांनी केले आहे. त्याबद्दल भालचंद्र फडके आपल्या प्रस्तावनेत "गोखले यांना `फुलेची झाली भ्रमर` ही मोकाशींच्या मनाच्या तरल,अस्वस्थ स्थितीचे चित्र रेखाटणारी कथा चांगली जमली आहे"[५] असे लिहितात.

ब) <u>मोकाशींच्या कथेचे स्वरुप --</u>

विसाव्या शतकातील उत्तरार्धाच्या प्रारंभीच्या मराठी ललित वाङ्‌मयातील कथा-कादंबरी,ललित निबंध,विनोदी वाङ्‌मय इ. वाङ्‌मय प्रकाराची प्रेरणा व

निर्मिती मराठी वाङ्मयेतिहासकारांच्या दृष्टिकोणातून लक्षवेधी ठरते.

गाडगीळ, गोखले, भावे व माडगूळकर या कथाकारांमुळे मराठी कथेत परिवर्तन झाले. तिला नवचैतन्य प्राप्त झाले. या चौघांसोबत दि.बा.मोकाशी यांनीही मराठी वाङ्मयाचे शिल्प घडविण्याची मोलाची कामगिरी केली आहे. म्हणूनच अ.ना. देशपांडे यांनी 'लामणदिवा घेऊन जाणारे दि.बा.मोकाशी हे मराठी कथेच्या मार्गावरील आणखी एक प्रवासी'[२] असे मोकाशींविषयी म्हटले आहे. वरील चौघानंतर पाचवा क्रमांक कुणाचा ? क्रमांकाला कितपत महत्त्व द्यावयाचे या साठीच पाचवा क्रमांक म्हणून नव्हे तर वरील चौघांबरोबर पाचवे नाव दि.बा. मोकाशींचे घ्यावे लागते.

त्यांची पहिली कथा 'अनंता' ही सन १९३८ साली प्रसिध्द झाली. तेव्हा मराठी कथेच्या विश्वात सारे सामसूम होते. आजूबाजूला जी कथा लिहिली जात होती त्या तुलनेने मोकाशींची कथा नवकथाच म्हणावी लागेल. त्यांची कथा मनाची विलक्षण पकड घेणारी आहे. त्यांची म्हणून खास लकब आहे. माणसाच्या मनाचे विविध पैलू ती दाखवून देते. त्यांच्या कथातून आशा-आकांक्षा-निराशा-दैवाचे खेळ श्रावणाच्या ऊन सावली सारखे येतात. त्यातून कृत्रिम नाट्यही निर्माण होते. त्यांची कथा नादाची पताका खांद्यावर मिरवीत नाही. ती आपल्या चिंतनात मग्न असते. ती शाश्वताचे रंग लेवून आलेली असते. ती सदोदित चिरतरुण वाटते. प्रत्येकाला ती आपली कथा वाटते. अशी त्यांची कथा लक्षणीय असतानाही त्यांच्या कथेचा गौरव होऊ नये याची खंत वाटते.

त्यांच्या कथेची ही वैशिष्टयता लक्षात घेऊनच दि.बा.मोकाशींच्या कथा वाङ्मयाचा शोध आणि बोध या शोध-निबंधातून घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

मोकाशींचे कथाविश्व हे प्राधान्याने मध्यमवर्गीय अनुभवांशी निगडित आहे. या वर्गातील कौटुंबिक अनुभवावरच त्यांना अधिक भर द्यावयाचा आहे. त्यांनी स्वतःच मॅजेस्टिक बुक स्टॉलच्या साहित्यिक गप्पामध्ये मुलाखतीच्या वेळी म्हटले आहे की, 'या आयुष्याचा शोध घेणं हा माझा मुख्य गाभा होता. माझ्या गोष्टी सर्व

प्रकारच्या असतील, काही चावट असतील,काही प्रेमाच्या असतील,पण हे सगळं करताना मनात वाटायचं की आता मला जो प्रश्न पडलाय तो सुटायचा असेल तर मला लिहिलंच पाहिजे. लिखाणात अनेक तऱ्हेचे स्वभाव लिहिताना, अनेक प्रसंग लिहिताना एक वेळ अशी येईल की जीवनाचा अर्थ मला समजेल असेच जीवन आहे असे मला सांगता येईल.' [३]

दि.बा.मोकाशी यांची कथा साधी,सरळ,संयत अशी आहे. ओघवती व अनलंकृत भाषा आणि सौम्य व रोजच्या आयुष्यातील घटना ही त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये होत. त्यांच्या कथेत उपमा,उत्प्रेक्षा अभावानेच आढळतात. त्यांच्या कथेत सजावट वा भडक रंग नसतात. संवाद प्रभावी व खटकेबाज असतात. कथेची सुरुवात एकदम विषयाला हात घालणारी असते. कथेच्या शेवटी कलाटणी द्यायची क्लृप्ती तीत वापरलेली नसते. साध्या प्रसंगातून वा प्रेमयातून ते अतिशय वाचनीय व विचारांना हलकासा झोका देणारी कथा लिहितात. भावनांचे तुफान,मनातील द्वंद्व ,आत्यंतिक प्रेम, प्रखर ध्येयावाद इ. विषयांचे वा परिणामांचे त्यांचे कथालेखन नसते. ते असते एका प्रांजळ मनाचे, जगाच्या व्यवहाराकडे कुतूहलाने व आस्थेने पाहणाऱ्या एका कलावंताचे लेखन.

'मोकाशी' यांनी लिहिलेल्या कथा बहुसंख्य प्रथम पुरुषी, एक वचनी आहेत. आणि त्याही बऱ्याचशा नव्याने ओळख झालेल्या तरुण-तरुणींच्या मनात अंकुरणारी प्रेमभावना व त्याचे सीमा सांभाळून केलेले प्रकटीकरण या संबंधीच्या आहेत. अशा 'प्रेम' कथां खेरीज बेकारी व उपासमारीने ग्रासलेली ग्रामीण कुटुंबे , मध्यम वर्गीयांची स्वप्ने व खंत, निसर्गाचा मानवी आक्रमणाने ढळलेला तोल, आयुष्याचे कडवट अनुभव, वाढाळू वयातील समस्या वगैरे विषयावरही त्यांनी कथा लेखन केलेले आहे व या विषयांना अनुरुप असेच विश्व आणि व्यक्ती त्यांच्या कथांतून असतात. खेड्यातील झोपडी,चावडी अगर शेताचा बांध,शहरातील चाळ,उद्यान अगर जुना बाजार, लेणी,ओसाड देऊळ अगर टेकडी, भावडे खेडूत,चौकस अगर बेकार तरुण, प्रणयपीडित स्त्री-पुरुष,चिमणी-कावळे व गायी-म्हशी देखील .' [४]

लहान मुलात रमणारे व त्यांच्यावर कथालेखन करणारे मोकाशी वितान कथेप्रमाणे बालवाङ्मयाकडेही नकळत ओढले गेले. बालकांसाठी त्यांनी कितीतरी

गोष्टी लिहिल्या. त्या अद्‌भुत, विनोदी जशा होत्या तशाच त्या रोजच्या प्रसंगातल्या, संस्कार, करणाऱ्याही होत्या. `गुपित `, जगाच्या कोलांट्या `, `अंधार दरी ` ही मुलांच्या गोष्टीची पुस्तके प्रसिध्द आहेत. त्यांच्या बालकांसाठी लिहिलेल्या गोष्टी `महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ` या सरकारी संस्थेने प्रकाशित केलेल्या संस्कार वाचन मालेत समाविष्ट केलेल्या आहेत.

कुमार कथा, विज्ञान कथा, प्रवासवर्णन, कादंबरी इ. विविध वाङ्‌मयप्रकार हाताळूनही मोकाशींना ओळखले जाते ते एक अभिजात कथाकार म्हणून । नव्या मराठी कथेच्या उत्कर्षातले एक आघाडीचे कथाकार म्हणून ।

पहिल्या व दुसऱ्या महायुध्दाचे परिणाम समकालीन साहित्यावर झालेले होते. महायुध्दाच्या छायेतून आलेली अर्थशून्यता वैफल्यग्रस्तता तीव्रतेने व्यक्त करणारा, अगतिकतेमुळे कारुण्यमुक्त झालेला असा नवसाहित्याचा सूर पाहण्यास मिळत होता. पण मोकाशींच्या प्रसन्न निर्मळ वृत्तीला साहित्यातील हीप्रबळ विरोधी ऊर्मी झाकाळू शकली नाही. या संदर्भात `न मिटणारे वर्तुळ ` या लेखात लिहिताना ते म्हणतात, `सुख-दुःखाचे जो पर्यन्त मूळ कळले नाही तो पर्यन्त दोन्ही आपल्याला सारखेच असे म्हणतात की ट्रॅजिडी लिहून झाल्यावर शेक्सपिअर शेवटच्या नाटकात कॉमेडीवर आला. केवळ ट्रॅजिडीचेच कौतुक करीत राहणे हे दर पाच वर्षांनी जगाचा अंत ओढवणार आहे असे भविष्य वर्तविणाऱ्या ज्योतिषा - सारखे वाटते. मला बुध्द आवडतो, त्याने दुःख बाजूला लोटले. ऋषी सुध्दा याला अपवाद नाहीत. त्यांनी आनंददायी असाच परमेश्वर शोधण्याचा प्रयत्न केला. मला ट्रॅजिडी तात्कालिक वाटते. कॉमेडी अखंड वाटते, प्रश्न राहतील तो पर्यन्त ट्रॅजिडी राहतीलच. पण ज्ञान वाढेल तशा ट्रॅजिडीच्या कथा दूरदूर जाणार . माणूस चंद्रावर गेल्यावर जसे स्वर्ग-नरक आणखी वर गेले तसे ट्रॅजिडीतून माणूस शिकतो, पुढे जातो, पण आनंद हा नेहमी आनंद असतो. तो सर्वत्र भरलेला आहे. सगळ्या वयातील सगळ्या काळातला आनंद सारखाच , ट्रॅजिडी प्रदेश मोकळा करीत जाते, कॉमेडी त्यावर राज्य करीत राहते. `

त्यांच्या वरील उद्‌गारातून त्यांची जीवनदृष्टी व साहित्य दृष्टी पूर्णत्वे

स्पष्ट झाली आहे. किंबहुना त्या वेगळ्या अशा नाहीतच . त्यांच्या एकत्र येण्याने त्यांच्या साहित्याला खोली प्राप्त झाली आहे. तर कांही मर्यादाही पडल्या आहेत. काही कथांचे शोकांत कलादृष्टया अटळ असूनही मोकाशींनी टाळलेले आहेत.

' मोकाशींच्या लेखनात एकप्रकारची अलिप्तता आहे. जीवनातील व्यंगे ते पाहतात व आलिप्तपणाने काहीशा मिस्किल ऊपरोधातून ते वाचका समोर ठेवतात. त्यांची कथा प्रयोगशील आहे. घाटाचे व निवेदन शैलीचे नवेनवे प्रयोग करण्याची तिची हौस आहे. '[5] असे इंदुमती शेवडे मोकाशींच्या कथेविषयी लिहितात.

क) नवकथेमध्ये मोकाशींचे स्थान --

' जीवनाचे सर्वांगीण आकलन हे नव्या कथेचे आश्रयस्थान होते. प्रत्येक कथाकार आपापल्या प्रतिमा धर्मानुसार हे आकलन करताना वेगवेगळ्या भावकेन्द्रावर भर देत होता. वेगवेगळ्या परिवेशात चित्रित करीत होता. गाडगीळ-गोखले यांनी औद्योगिक कारणाने वाढलेल्या शहरातल्या मध्यमवर्गीय स्तरावर भर दिला. त्यात गाडगीळ माणसाच्या एकाकीपणाचा, जीवनातल्या सूत्रहिनतेचा, कंटाळवाण्या जीवनाचा बोध व्यक्त करत होते. आणि माणसाच्या जाणीवेचा वेध घेऊन पाहत होते. गोखले - भावे भावनांचे तळ शोधत होते. माडगूळकर माणसाच्या दुःखाची नस शोधीत होते. तर मोकाशी बदलत्या मूल्यव्यवस्थेत कुटुंबातील नात्यांना नवा अर्थ देऊन पाहत होते. '[6] या प्रमा गणोरकरांच्या म्हणण्याप्रमाणे मोकाशींची कथा नवकथा या प्रकारात मोडते. गाडगीळ, गोखले, भावे व माडगूळकर हे नव कथेचे प्रणेते मानले जातात. पण मोकाशींचा त्यात उल्लेखही केलेला नाही. वरील नवकथाकारांच्या कथेतून जाणवणारी नवकथेची जी वैशिष्टये आहेत ती वैशिष्टये मोकाशींच्याही कथेत आढळतात. शिवाय ते त्यांच्या समकालीन कथाकारही होते याचाच अर्थ वरील चार नवकथाकारांच्या मालिकेत दि.बा.मोकाशींचाही समावेश होणे अपरिहार्य आहे. पण तसे न होता त्यांना त्यापासून वंचित ठेवले आहे. खऱ्या अर्थाने त्यांच्या कथांची समीक्षा झालेलीच नाही. याचे कारण म्हणजे वरील चार मंडळी मित्रत्वाच्या नात्याने एकत्र आली व नेहमी प्रसिध्दीच्या झोतात राहिली. त्यामुळे त्यांच्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. त्यांची कथा नवकथेच्या चाकोरीत बसली म्हणून त्यांना नवकथेचे

प्रणोतेपद बहाल केले. त्यांच्या भोवती एक प्रकारचे वलय निर्माण झाले व त्यामुळे मानवी गूढ मनाचा मागोवा घेणारी, दुसऱ्या महायुध्दानंतर झालेली मानवी जीवनाची अर्थशून्यता, विफलता, अगतिकता याचा सूर गवसलेली त्याच प्रमाणे मानवी मनातील गुंतागुंत दाखविणारी अशी एक वेगळ्या जातीची कथा लिहिणारे कथाकार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले. ती कथा पूर्वीच्या कथाकारांनी पाडलेली चाकोरी सोडून दुसरे वळण घेऊ लागली. म्हणूनच त्या कथेने सर्वांचे कुतूहल जागृत केले व सर्वांना आपल्याकडे खेचून घेतले, हे जरी खरे असले तरी दि.बा. मोकाशी हे सुध्दा वरील कथाकारांबरोबरच कथाकार होते. पण इतरापेक्षा त्यांचा धन्दा वेगळा होता. रेडिओ, टी.व्ही. दुरुस्ती करण्यातच त्यांचा पूर्ण दिवस जात होता. त्यामुळे वरील चार मंडळी प्रमाणे दि.बा.मोकाशी प्रसिध्दीच्या झोतात राहिले नाहीत. त्यामुळे सर्वांचे त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले. एक नवकथाकार म्हणून त्यांच्या कथांचा अभ्यास झालाच नाही.

मोकाशींच्या पिंडगत प्रसन्न निर्मळ प्रयत्नवादी वृत्तीमुळे दुसऱ्या महायुध्दानंतर मानवी जीवनाची उमगलेली अर्थशून्यता, विफलता, अगतिकता यांचा सूर त्यांच्या कथेत उमटत नाही. हे नवकथेचे एक वैशिष्ट्य मानले असले तरी व ते त्यांच्या कथेत नसले तरी नवकथेचे जे दुसरे वैशिष्ट्य मानवी मनातील गुंतागुंत, विविध अनुभवातील अर्थशोधन हे त्यांच्या कथेत ठायी ठायी पाहण्यास मिळते. सर्वसामान्य माणसाचे अनुभव व त्याचे मन याचे मोकाशींनी केलेले विवेचन वरील चार प्रणेत्यापेक्षाही सरस आहे. ` दि.बा.मोकाशी हे त्या मानाने तरल भावनांना स्पर्श करणारे कथाकार आहेत. त्यांच्या कथा या सामान्य माणसांच्या कथा असल्या तरी त्या सामान्य नाहीत. कारण त्या सामान्य अनुभवांच्या मागे त्यांचे चिंतनशील मन उभे राहते. आणि बऱ्याच तटस्थ वृत्तीने ते अनुभवांचा वेध घेतात. त्यांच्या कथांतील अनुभव हा साधा, सामान्य वाटतो. पण तरीही त्यातील गूढता, संमिश्रता, नाट्यमयता मनाला मोहून टाकते. त्यांच्या चिंतनशील वृत्तीमुळे साध्या साध्या अनुभवाना आकार देताना ` आता ` आमोद सुनासि आले ` सारख्या कथांच्या निर्मितीच्या वेळी त्यांना खूप वेदना होत असाव्यात. अशा कथांच्या निर्मितीच्या वेळच्या वेदनांचे व

अस्वस्थतेचे एक काल्पनिक पण सुंदर चित्रण नवकथेचे एक प्रणेते अरविंद गोखले यांनी ` फुलेचि झाली भ्रमर ` या आपल्या कथेत केले आहे.

मोकाशींच्या कथेने जुनी चाकोरी स्विकारली नाही. म्हणून ती सांकेतिक होत नाही. नवकथेचे समकालीन सूर न पकडता वेगळ्या अंगाने मानवी जीवन, त्यांचे मन शोधण्यास ती उद्युक्त होते. या शोधात निसर्ग शोधाबरोबरच गूढता येते. आणि ती अनुभवात मुरलेली आहे. त्याची कथा जुन्या नव्याच्या तिखट चर्चेत भाग न घेता आपल्या भावविश्वाशी व काळाशी इमान राखून लेखन करणाऱ्या पैकी मोकाशींची कथा विशेष लक्षणीय आहे. त्यांच्याकडे चमत्कृत करणारा लक्षवेधी गुणविशेष नाही. त्यानी स्वतःच्या लेखकीय व्यक्तीत्वाशी अव्यभिचारी निष्ठा ठेऊन जीवनात येणाऱ्या अनुभवांना प्रमाण मानले. दुःखाला जसे शाश्वत सत्याचे रुप दिले नाही तसेच सुखाला दूर लोटले नाही.

त्यांच्या कथेविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, ` दि.बा. मोकाशींची कथा अधिक संयत, साधी, संप्रवाही असते. ते घटना व माणसे अलिप्तपणे समोर ठेवतात. त्यांची सहानुभूती व्यापक आहे. बालकांपासून वृध्दापर्यन्त निरनिराळ्या व्यक्तींची मने ते साकार करतात. मोकाशींच्या कथेत संस्कारशील धार्मिक वृत्तीचा मनोज्ञ प्रत्यय येतो. `[७] तर त्यांच्या कथेच्या क्षेत्राविषयी पु.ग. सहस्त्रबुध्दे वर्णन करतात की, ` दि.बा. मोकाशींच्या कथांचे क्षेत्र खूपच व्यापक आहे. विविध क्षेत्रातील व थरातील पात्रे त्यांच्या कथात येतात व जीवनाचे बहुरंगी दर्शन घडवितात. उदा. ` काय रानटी लोक आहेत ! `, ` आता आमोद सुनासि आले `, ` शेमच्या सुताराची गोष्ट ` इ. होत. `[८] तर डॉ.म.द.हातकणंगले सारख्या श्रेष्ठ समीक्षकानेही ` मोकाशींचे कथालेखन संयमाने, सातत्याने आणि स्वतंत्रपणे घडत आले आहे. हलक्या फुलक्या संवाद, संभाषणातून सखोल, सूक्ष्म, भावनांची जाणीव करुन देण्याचे त्यांच्या कथांचे खास लक्षणीय आहे. `[९] असे मराठी कथारुप आणि परिसर ` या आपल्या ग्रंथात पृ. २२ वर स्पष्ट केले आहे.

UNIVERSITY KOLHAPUR

संदर्भ


१ भालचंद्र फडके - अरविंद गोखले यांची कथा - प्रस्तावना - पृ. २७
कॉन्टिनेंटल प्रकाशन ,पुणे,प्रथमावृत्ती,
१९७३

२ अ.ना.देशपांडे - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - पृ.५८१-८२
व्हीनस प्रकाशन - प्रत १ली - १९५८

३ विजय कुवळेकर - दि.बा.मोकाशी यांची मुलाखत - - पृ.५४
मुलाखत - शद्बांकन ,
ललित - ऑगस्ट - १९८१

४ अरविंद गोखले (संपादक ) - दि.बा.मोकाशी यांची कथा-प्रस्तावना - पृ.६
साहित्य अकादेमी - प्रथम आवृत्ती, १९८८

५ इंदुमती शेवडे - मराठी कथा उगम आणि विकास - पृ. ४२०
सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि.,मुंबई,
दिल्ली, १९७९

६ प्रभा गणोरकर - नवकथा प्रेरणा आणि स्वरुप - - पृ.
मराठी कथा शताब्दी महोत्सव - मराठी
कथा सुवर्ण महोत्सव - गोमंतक मराठी
अकादमी, पणजी २८, २९, ३० मार्च १९९१

७ गो.मा.पवार - म.द.हातकणंगलेकर - संपादक - मराठी - पृ. १४७
साहित्य प्रेरणा व स्वरुप - कथा - चंद्रकात
बांदिवडेकर ( १९५०-७५ )
प्पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.पहिली आवृत्ती,
१९८६-। १९०७

८ पु.ग.सहस्त्रबुध्दे - महाराष्ट्र संस्कृती - पृ. ७६४
कॉन्टिनेंटल प्रकाशन - प्रथम आवृत्ती,
१९७९.

९ डॉ.म.द.हातकणंगले - मराठी कथारूप आणि परिसर - पृ. २२ .